वाचा :- १) म.अवर सचिव, ग्राम विकास विभाग, यांचे कडील शासन आदेश क्र.मविसे १०/प्र.क्र.३८/२०१७ आस्था ३अ, दि.४ जुलै२०१७

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव यांचेकडील आदेश जा.क्र.साप्रवि/आस्था१०/आरआर/७६८/२०१७, दि.२९/०९/२०१७

३) श्री. नंदकुमार पुंडलीक वाणी, गट विकास अधिकारी, वर्ग १ यांचेकडील हजर अहवाल दि. ०२/०४/२०१८.

४) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक-02/04/२०१८.

---

नाशिक जिल्हा परिषद,नाशिक
जा.क्र.साप्रवि/आस्था-१/1063 /२०१८
नाशिक दिनांक- 02/04/ २०१८

आदेश

वाचा क्र. ०१ अन्वये महाराष्ट्र विकास सेवा गट अ मधील श्री. नंदकुमार पुंडलीक वाणी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (साप्रवि) जि. प. जळगांव यांची बदलीने पदस्थापना गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिन्नर, जि.नाशिक या पदावर करण्यात आली आहे. श्री. वाणी, हे दिनांक २०/०६/२०१७ पासुन वैद्यकिय रजेवर होते. वाचा क्र. ०२ अन्वये श्री. वाणी, यांना बदलीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी दि.२९/०९/२०१७चे आदेशान्वये रजेवर असतांनाच कार्यमुक्त करण्यात आलेले आहे.

सबब श्री. नंदकुमार पुंडलीक वाणी, हे जिल्हा परिषद नाशिक येथे दि.०२/०४/२०१८ रोजी मध्यान्होपुर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिन्नर या पदावर हजर झाले आहेत.

श्री. रत्नाकर पगार सहा. गट विकास अधिकारी, पं.स. सिन्नर यांनी त्यांचेकडेस अतिरिक्त म्हणून सोपविण्यात आलेला गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिन्नर हया पदाचा कार्यभार श्री. नंदकुमार पुंडलीक वाणी, गट विकास अधिकारी, यांचेकडे सुपुर्द करावा व श्री. नंदकुमार पुंडलीक वाणी, यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिन्नर या पदाचा कार्यभार स्विकारावा. कार्यभार हस्तांतर केल्याबद्लचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे.

श्री. रत्नाकर पगार सहा. गट विकास अधिकारी, पं.स. सिन्नर यांनी त्यांचे अधिनस्त कार्यरत असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचे दि.०१/०४/२०१८ पावेतोचे गोपनिय अहवाल प्रतिवेदीत / पुनर्विलोकन करुन व अल्प कालावधी प्रमाणपत्र देखील संबंधीत आस्थापनांकडे सादर करावे.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यांत यावी.

सदर आदेशाची नोंद संबधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

डॉ. नरेश गिते (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रति,

श्री. नंदकुमार पुंडलीक वाणी, गट विकास अधिकारी, पं.स. सिन्नर
श्री. रत्नाकर पगार सहा. गट विकास अधिकारी, पं.स. सिन्नर

प्रत :- माहितीसाठी सविनय सादर

म.अवर सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,२५, मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई ०१
म.कार्यासन अधिकारी, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,२५, मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई ०१ (लक्षवेध आस्था ३अ)
म.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक

प्रत :- माहितसाठी समादराने अग्रेषित

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

उप आयुक्त(विकास/आस्थापना) म.विभागीय आयुक्त, कार्यालय नाशिक विभाग नाशिक
मुख्य लेखा वित्त अधिकारी जिल्हा परिषद,नाशिक/जळगांव
कोषागार अधिकारी,जिल्हा कोषागार कार्यालय,नाशिक / जळगांव
गट विकास अधिकारी, पंचायत समिती सिन्नर, जि.नाशिक
साप्रवि ज्ञापन नस्ती/साप्रवि रोखपाल यांना कार्यवाहीस्तव